प्रभाग समिती (ई) नालासोपारा (प.)
ता.वसई, जि.पालघर, पिन 401 203.

दूरध्वनी : 0250-2402179/2403224/2402101
फॅक्स : 0250-2402563
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com
जा.क्र. : व.वि.श.म./ साप्र/३२५८/२०२४
दिनांक : ०८/१०/२०२४

## फेर जाहिर दरपत्रक सुचना

याद्वारे कळविण्यांत येते की, वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती (ई) नालासोपारा कार्यक्षेत्रातील खालील यादीतील नमुद तलाव दि. ०१ ऑक्टोबर २०२४ ते दि. ३१ मार्च २०२७ या कालावधीकरिता ठेका पद्धतीने मत्स्यसंवर्धनाकरिता देणेकामी दरपत्रक मागविणेकामी फेर जाहिर दरपत्रक सुचना दि.०८/१०/२०२४ रोजी सका. ११.०० वाजलेपासून ते दि. १५/१०/२०२४ रोजी सायं. ४.०० वाजेपर्यंत महानगरपालिकेच्या vvcmc.in या संकेतस्थळावर तसेच प्रभाग समिती (ई) नालासोपारा कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करणेंत येत आहे. इच्छुक दरपत्रकधारकाने सदर कामाचे दरपत्रक बंद लिफाफ्यामध्ये दि.१५/१०/२०२४ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत प्रभाग समिती (ई) नालासोपारा कार्यालयाच्या सामान्य प्रशासन विभागात सादर करावेत.

| अ.क्र. | तलावाचे नाव | किमान देकार रक्कम | ठेकेदाराने भरावयाची रक्कम |
|---|---|---|---|
| १ | आंबड तलाव | १२२५८२ | |
| २ | नवाळे तलाव | १८४४७९ | |
| ३ | बाभळ तलाव | २००२६ | |
| ४ | गणेश तलाव | ४६७२५ | |
| ५ | वाटाण तलाव | ५८८६४ | |

### अटी-शर्ती

१. इच्छुक व्यक्ती व संस्था यांनी स्वतःचे लेटरपॅडवर दरपत्रक सादर करताना प्रत्येक तलावाचे स्वतंत्र दरपत्रक सादर करावे.

२. मालकाचे/संस्थेचे पॅनकार्ड झेरॉक्स प्रत जोडण्यांत यावी.

३. दरपत्रक मुदतीमध्ये व वेळेमध्ये प्रभाग समिती (ई) नालासोपारा (प.) येथील सामान्य प्रशासन विभागात सादर करणे बंधनकारक राहील.

४. दरपत्रकास मंजुरीची समज दिल्यानंतर कार्यालयात उपस्थित राहून रु. ५००/- चे करारपत्रावर करारनामा लिहून द्यावयाचा आहे. मुदतीत करारनामा न केल्यास दरपत्रक रद्द करण्यांत येईल.

५. जास्त देकार देणाऱ्या व्यक्ती अथवा संस्था हयांचे दरपत्रक मंजुर करणेंत येईल व मंजुर रक्कमेवर शासनाकडुन प्राप्त झालेल्या दरानुसार आयकर व GST लागू झाल्यास मंजुर दरपत्रकधारकास भरणा करणे बंधनकारक असेल.

६. मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके स्विकारणेचा अथवा नाकारणेचा अधिकार महापालिकेस राहील.

७. वरील अटींचे पालन जे व्यक्ती/संस्था करणार नाहीत त्यांचे दरपत्रक पडताळणी अंती अपात्र ठरविण्यांत येतील.

८. वरील तलावांची दरपत्रके बंद लिफाफ्यात दि. ०८/१०/२०२४ रोजी सका. ११.०० वाजलेपासून ते दि.१५/१०/२०२४ रोजी सायं. ४.०० वाजेपर्यंत प्रभाग समिती (ई) नालासोपारा (प.) येथे सादर करावित.

९. मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके दि. १८/१०/२०२४ रोजी दु. ४.०० वाजता अथवा तद्नंतर सोयीनुसार मा. सहा.आयुक्त यांचे दालनात उपस्थित दरपत्रकधारक अथवा त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यांत येतील.

उप-आयुक्त (तलाव)
वसई-विरार शहर महानगरपालिका